**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबईच्या दौऱ्यावर

- शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांचा पुनरुच्चार

- जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि अखेरच्या टप्प्यात १ वाजेपर्यंत ४४ टक्क्यांहून अधिक मतदान

- राज्यात यंदाच्या हंगामात सरासरीच्या तुलनेत १२६ टक्के पाऊस

**आणि**

- बांगलादेशविरुद्धची कसोटी क्रिकेट मालिका भारतानं जिंकली

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज मुंबई दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते मुंबई तसंच ठाणे आणि कोकण विभागातल्या भाजप आमदार, खासदार, पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांच्यासह मुंबईतले भाजपचे मंत्री, आमदार, खासदार भाग घेत आहेत. आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महायुतीच्या जागावाटपासंदर्भात अमित शाह यांच्या उपस्थितीत बैठक होणार असल्याचं समजतं.

**<><><><><>**

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केला आहे. विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींशी आज त्यांनी नवी दिल्ली इथं चर्चा केली. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. बियाणं आणि खतांची उपलब्धता तसंच खतांचा अतिवापर या मुद्यांवर यावेळी अर्थपूर्ण विधायक चर्चा झाल्याचं शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितलं.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकांच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या मतदानाला आज सकाळी सुरुवात झाली. दुपारी १ वाजेपर्यंत ४४ पूर्णांक ८ शतांश टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे. मतदान प्रक्रिया शांततेत, सुरळीतपणे पार पडावी यासाठी राज्यातील सात जिल्ह्यातील ४० मतदार संघात अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. संध्याकाळी ६ पर्यंत मतदानाची वेळ आहे. एकूण ५ हजार ६० मतदान केंद्र उभारण्यात आली असून ती प्राथमिक सोयीसुविधांनी सुसज्ज आहेत. २० हजारांहून अधिक निवडणूक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

या टप्प्यात ३९ लाखाहून अधिक मतदार ४१५ उमेदवारांचं भविष्य ठरवणार आहेत. जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी १८ सप्टेंबरला पहिल्या तर आणि २५ सप्टेंबर दुसऱ्या टप्प्यात मतदान झालं.

पहिल्या टप्प्यात ६१ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यात ५७ टक्के मतदानाची नोंद झाली. या सर्व टप्प्यांची मतमोजणी ८ ऑक्टोबरला होणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जम्मू काश्मीरमधल्या मतदारांनी आपला हक्क आवर्जून बजावावा, असं आवाहन केलं आहे. जम्मू काश्मीरमधे युवा आणि महिला मतदार मोठ्या प्रमाणावर मतदान करतील, अशी आशा त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्ट मधे व्यक्त केली आहे.

<><><><><>

हरियाणा विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असून प्रचारसभांना वेग आला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पलवलमधे भाजपा उमेदवारांसाठी सभा घेणार आहेत. गडपुरी टोलनाक्यावर ही सभा होणार असून त्यादृष्टीनं वाहतुकीचं नियमन करण्यात आलं आहे.

<><><><><>

मुंबईतल्या नायर रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांची बदली करण्याचं आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. लैंगिक छळ प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष समिती नेमण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. तसंच रुग्णालयातले कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अतिरीक्त उपाय योजना करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

<><><><><>

मराठा समाजातल्या नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आता ४२ पुरावे देता येणार आहे. मराठा समाजातील नागरिकांना यापैकी कुठल्याही

एका पुराव्यांच्या आधारे मराठा कुणबी नोंदींची पडताळणी करणं शक्य असल्याचं मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं आहे. मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीनंतर काल ते बोलत होते. SEBC अर्थात सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्गाऐवजी EWS अर्थात आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातल्या आरक्षणाची मागणी मराठा समाजाच्या विविध संघटनांनी केली आहे. पण आता तो पर्याय उपलब्ध नाही. ईडब्लूएस प्रवर्गात जाती आधारित आरक्षण नसल्यामुळे मराठा समाजाला गेल्या तीन वर्षात हे आरक्षण केवळ साडे आठ ते नऊ टक्के मिळालं आहे. SEBC असताना आर्थिक दृष्या मागासचं आरक्षण देता येत नाही, जातीचं आरक्षण मिळणाऱ्यांना ते आरक्षण मिळणार नाही. आता हा नवीन विषय समोर आला असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारतीय तेल कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात अठ्ठेचाळीस रूपये पन्नास पैसे इतकी वाढ केली आहे. या सिलिंडरची किंमत आता एक हजार सहाशे ब्याण्णव रुपये पन्नास पैसे इतकी झाली आहे. तर पाच किलो एलपीजी सिलिंडरच्या दरातही १२ रुपयांनी वाढ केली आहे. आजपासून हे दर लागू झाले आहेत. दरम्यान, घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**<><><><>**

यंदाच्या हंगामात राज्यात १२६ टक्के पाऊस पडला. सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडेल हा हवामान विभागाचा अंदाज खरा ठरल्याची माहिती हवामान विभागाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी दिली आहे.

हिंगोली आणि अमरावती वगळता राज्यातल्या सर्व जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. अहमदनगरमध्ये ४९ टक्के तर सांगलीत ४८ टक्के अधिक पावसाची नोंद झाली. जळगाव, नाशिक, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत ४० टक्के पेक्षा जास्त पाऊस झाला. हिंगोलीमध्ये सरासरीपेक्षा ३५ टक्के कमी तर अमरावतीमध्ये २ टक्के कमी पाऊस झाला.

यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा सुमारे २५८ मिलीमीटर अधिक पावसाची नोंद झाली आहे. दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यात सरासरी ९९४ मिलीमीटर पाऊस पडतो. मात्र यंदा या कालावधीत १ हजार २५८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते गोविंदा यांचा आज पहाटे मुंबई इथल्या निवासस्थानी अपघात झाला. परवाना असलेली रिव्हॉल्वर आपल्या कपाटात ठेवताना गोविंदा यांच्या हातून निसटली आणि त्यातून गोळीबार झाला. ही गोळी गोविंदा यांच्या पायाला लागल्याने त्यांना एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आलं. डॉक्टरांनी त्यांच्या पायातली गोळी काढली असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गोविंदा यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या प्रकृतीविषयी विचारपूस केली. गोविंदा हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय आणि प्रतिष्ठित व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी सदिच्छा व्यक्त करत आहोत, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते रजनीकांत यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे चेन्नईच्या अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. रुग्णालयाकडून रजनीकांत यांच्या प्रकृतीविषयी कोणतीही अधिकृत वैद्यकीय माहिती जाहीर झालेली नाही. तथापि, रजनीकांत यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

<><><><><>

येत्या नवरात्रोत्सवानिमित्त ७ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर दरम्यान मुंबईतल्या मेट्रोच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात येईल. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हा निर्णय घेतला असून या कालावधीत रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी अतिरिक्त मेट्रो चालवल्या जातील, अशी माहिती मेट्रोच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

<><><><><>

स्वच्छ भारत अभियानांतर्गत यंदा देशात २४ लाखांहून अधिक कार्यक्रम झाले. स्वच्छता ही सेवा अभियानात यावर्षी २० कोटींहून अधिक नागरिक सहभागी झाले अशी माहिती केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी दिली आहे. देशभरातले ३८ लाख सफाई मित्र यात सहभागी झाले होते. राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिकांनी यात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. आकाशवाणी मुंबईच्या नवीन प्रसारण भवन कार्यालयाच्या आवारात आज सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वच्छता ही सेवा अभियानात श्रमदान केलं. स्वच्छता मित्र आणि कर्मचाऱ्यांसाठी आरोग्यशिबिरही आयोजित करण्यात आलं होतं.

<><><><><>

बांगलादेशाविरुद्धच्या मालिकेतला दुसरा आणि अंतिम सामना आज भारतानं जिंकला. बांग्लादेशाकडून मिळालेलं ९५ धावांचं आव्हान भारतानं ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. भारतानं ही मालिका २-० अशी जिंकली. यशस्वी जयस्वाल सामनावीर तर आर. अश्विन मालिकावीर ठरला. पाचव्या दिवशी बांगलादेशाचा दुसरा डाव १४६ धावांवर आटोपला. जसप्रित बुमराह, आर. अश्विन आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. यशस्वी जयस्वालच्या ५१ आणि विराट कोहलीच्या नाबाद २९ धावांच्या बळावर भारतानं हा सामना जिंकला.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पोर्ट फेडरेशन ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या पार्थ राकेश माने याने १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्ण पदक जिंकलं. पेरू इथल्या लिमामध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताच्या अजय मलिक आणि अभिनव शॉ या जोडीनेही १० मीटर एअर रायफल स्पर्धेच्या पुरुषांच्या सांघिक गटात सुवर्णपदक पटकावलं. तर याच स्पर्धेच्या महिलांच्या ज्युनियर गटात गौतमी भानोत, शांभवी क्षीरसागर आणि अनुष्का ठाकूर यांनी १० मीटर एअर रायफलमध्ये सांघिक स्पर्धेत भारताला तिसरं सुवर्ण पदक मिळवून दिलं. या स्पर्धेत सध्या भारत पाच सुवर्णपदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

//<><><><><>//